॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001**

**(कुलगुरू कार्यालय)**

जा.क्र.: कबचौउमवि/1/विद्या परिषद-व्यवस्थापन परिषद निवडणूक अपील/134/2023 दि : 26/04/2023

प्रति,
**डॉ. मनोजकुमार झुंबरलाल चोपडा,**
खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे
एम. जे. कॉलेज, जळगाव
(mzczoo@gmail.com)

**विषय : विद्यापीठ प्राधिकरण निवडणूक-2022**
**विद्या परिषदेच्या सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी प्रसिध्द केलेल्या अवैध नामनिर्देशनाबाबत आपल्या तक्रार (अपील) अर्जावरील निर्णय....**
**संदर्भ : आपला दि.26/04/2023 रोजीचा ई-मेल**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील कलम 30(4)(j) नुसार व्यवस्थापन परिषदेसाठी विद्या परिषदेचे सदस्य असलेल्या निर्वाचित अध्यापक यांच्या प्रतिनिधींमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरिता विद्यापीठाने निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला आहे. सदरहू निवडणूक कार्यक्रमानुसार आपण नामांकन अर्ज सादर केलेला आहे. सदर नामांकन अर्जाची छाननी कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दि.25/04/2023 रोजी केली असता त्यात आपला नामांकन अर्ज अवैध ठरविण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील तरतुदीन्वये निर्गमित करण्यात आलेला 2017 मधील एकरुप परिनियम क्र.01 मधील नियम क्र. 10(7) नुसार आपण सादर केलेले अपीलावरील सुनावणी व आपले म्हणणे सादर करण्यासाठी दि.26/04/2023 रोजी दुपारी 03.00 वाजता तक्रार(अपील) अर्जावरील सुनावणी कुलगुरू यांचेकडे आयोजित करण्यात आली व आपणास तसा ई-मेल देखील पाठविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दूरध्वनी संदेशाव्दारे देखील सुनावणीबाबत आपणास कळविण्यात आले होते.

सदरहू सुनावणीस आपण काही कारणांमुळे अनुपस्थित होते व तसे आपण कळविले आहे. ही बाब विचारात घेता, आपल्या उपरोक्त संदर्भांकित तक्रार(अपील) अर्जात नमूद केलेल्या मुद्यांबाबत सखोल विचार विनीयम करण्यात आला व यासंदर्भात आपणास पूरेपुर संधी दिलेली आहे. तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन नियमांचे अवलोकन करण्यात आलेले आहे.

सबब, आपल्या नामांकन अर्जासंदर्भात प्राप्त अपीलावर खालीलप्रमाणे निर्णय कळविण्यात येत आहे :

<u>निर्णय</u> : **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील तरतुदीन्वये निर्गमित करण्यात आलेला 2017 मधील एकरुप परिनियम क्र.01 मधील नियम क्र. 10(7) नुसार आपले अपील कुलगुरू यांच्या नावाने प्राप्त होणे आवश्यक होते. तथापि आपण सदरहु अपील कुलसचिव यांचे नावे सादर केले आहे.तरी सुध्दा नैसर्गिक न्याय तत्वानुसार आपणास म्हणणे मांडण्याची व अधिकची कागदपत्रे सादर करण्यासाठी संधी उपलब्ध व्हावी म्हणून कुलगुरू यांनी सुनावणी आयोजित केली होती. आपण सुनावणीस उपस्थित राहु शकत नाही, असे ई-मेल व्दारा आपण कळविले होते.**

**या संपूर्ण बाबींची नोंद घेऊन त्याचप्रमाणे निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी केलेली कार्यवाही, संबंधित नियमांतील तरतूदी, इत्यादी संपूर्ण बाबी विचारात घेता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील कलम 30(4)(j) मध्ये नमूद निर्वाचित अध्यापक या निकषानुसार आपण पात्र नसल्यामुळे आपले नामांकन अर्ज नाकारण्या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे. सबब, आपले उपरोक्त संदर्भिय तक्रार(अपील) अमान्य करण्यात येत आहे.**

वरील निर्णय एकरुप परिनियम क्र.1/2017 मधील 10(7) या नियमानुसार घेतला असून हा निर्णय अंतिम आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

Maheshwari 26/4/23

**(प्रा. वि. ल. माहेश्वरी)**
कुलगुरू

**प्रत :** कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.